## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

**अपिल क्रमांक : के.आर- ७५/२०२४**

**अपिल क्रमांक : के.आर- ८५/२०२४**

**अपिल क्रमांक : के.आर- ८६/२०२४**

**अपिल क्रमांक : के.आर- १६२/२०२४**

**अपिल क्रमांक : के.आर- १७०/२०२४**

**अपिल क्रमांक : के.आर- २६०/२०२४**

**मधील तक्रार क्र.१०९/२०२५**

**अपिलार्थी, श्री.असरार अहमद नजीर अ.सिध्दीकी**
एफ१/१, फ्लॅट नं.४, ज्ञानदिप को.ऑ.हौ.सो.,
सेक्टर ३-४, वाशी नवी मुंबई ४०० ७०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,
आमलेंडू रॉयमार्ग, जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी,
आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,
आमलेंडू रॉयमार्ग, जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २३.१०.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०६.२०२३ | -- | २३.०८.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी दि. ०४.०१.२०२४, दि.०५.०१.२०२४, दि.१०.०१.२०२४, दि.११.०१.२०२४, दि.१५.०१.२०२४ रोजीच्या ०६ अर्जान्वये *" PIO of ICLES Motilal Jhunjhunwala College has not provide the information. "* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये ६ व्दितीय अपिल अर्ज दाखल केले आहेत. सदर द्वितीय अपिलांवर आज दिनांक २३.१०.२०२४ रोजी एकत्रित सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुनझुनवाला कॉलेज, वाशी यांच्या वतीने द लॉ पॉईंट या फर्म तर्फे ॲड.सिध्दांत त्रिवेदी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ ६ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

| अपिल क्रमांक | माहितीचा विषय |
|---|---|
| ७५/२०२१ | ०१.०१.२०१७ to ३१.१२.२०२२- Information related to the Structural Audit of ICLES Motial Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai.<br>Please provide certified copy of Structural Audit Report of ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above-mentioned period. |
| ८५/२०२४ | ०१.०४.२०१८ to ३०.०४.२०२३ Information related to the Fire and safety Audit of ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai.<br>Please provide certified copy of Fire and safety Audit Report of ICLES Motilal Jhunjhunwala college, Vashi Navi Mumbai for the above mentioned period. |
| ८६/२०२४ | ०१.०१.२००७ to ३१.१२.२०१८- Information about fund/grant received from UGC under XI and Xii plans and its utilization for students from SC/St/OBC (non-creamy layer) & minority community by ICLES Motilal Jhunjhunwala college, Vashi, Navi Mumbai.<br>१) Please provide certified copy of fund/ grant received from UGC under XI plan and its utilization for Remedial coaching for students from SC/St/OBC (non-creamy layer) & minority |

| | |
|---|---|
| | community by ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period.<br>२) Please provide certified copy of fund/grant received from UGC under XI and XII plans and its utilization for Coaching for NET for students fron SC/ST/OBC (non-creamy layer) & minority community by ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period.<br>३) Please provide certified copy of fund/grant received from UGC under XI and XII plans and its utilization for Coaching class for entry in services for students form SC/ST/OBC (non-creamy layer) & minority community by ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period. |
| १६२/२०२४ | ०१.०१.२००७ to ३१.१२.२०१८- Information about fund/grant received from UGC under XII plans and its utilization for Establishment and Monitoring of the Internal Quality Assurance Cells (IQACs) in Colleges by ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai.<br>१) Please provide certified copy of fund/ grant received from UGC under XII plan for Establishment and Monitoring of the Internal Quality, Assurance Cells (IQACs) in Colleges by ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period.<br>२) Please provide certified copy of utilization of fund/ grant received from UGC under XII plan for Establishment and Monitoring of the Internal Quality, Assurance Cells (IQACs) in Colleges by ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period. |
| १७०/२०२४ | ०१.०६.२००१८ to till date- Composition and functioning of Grievance Redressal Cell of ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai.<br>१) Please provide certified copy of composition of Students Grievance Redressal Cell and Staff Grievance Redressal Cell of ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period.<br>२) Please provide certified copy of Grievances of Students received and their Redressal by Students Grievance Redressal Cell of ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period.<br>३) Please provide certified copy of Grievances of Staff received and their Redressal Staff Grievance Redressal Cell of ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period.<br>४) Please provide certified copy of Proceedings of all the meetings of Students Grievance Redressal Cell of ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period.<br>५) Please provide certified copy of proceedings of all the meetings of Staff Grievance Redressal Cell of ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period. |
| २६०/२०२४ | ०१.०४.२०१८ to ३०.०४.२०२३ Information related to the Yuva-Raksha Scheme of ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai.<br>१) Please provide certified copy of details of implementation of Yuva Raksha: Students Group Insurance Scheme in ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period.<br>२) Please provide certified copy of Compliance Report of action taken on implementation of Yuva Raksha: Students Group Insurance Scheme in ICLES Jhunjhunwala College, Vashi Navi Mumbai for the above mentioned period. |

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे नमूद केले की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी, मोतीलाल झुनझुनवाला कॉलेज, वाशी यांचे तर्फे The Law Point ह्या संस्थेला त्यांचे प्रतिनिधी म्हणून सुनावणीसाठी पाठविले आहे. ॲड.सिध्दांत त्रिवेदी हे सदर फर्मतर्फे हजर झाले आहेत. त्यांनी असे निवेदन केले की, त्यांना संबंधित संस्थेकडून सुचना प्राप्त झालेल्या नसल्यामुळे व अभ्यासाकरिता वेळ मिळाला नसल्याने, पुढील सुनावणीची तारिख देण्यात यावी. सर्वसाधारणपणे माहिती अधिकार अधिनियमांतर्गतल्या प्रकरणावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची उपस्थिती अपेक्षित असते. लॉ फर्मची नियुक्ती या कायद्यामधील प्रकरण चालवण्यासाठी अपेक्षित नाही. त्यामुळे ॲड.सिध्दांत त्रिवेदी यांनी केलेली विनंती मान्य करता येत नाही.

अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांना माहिती देण्यात आलेली नाही. त्याप्रमाणे त्यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी सुध्दा घेतलेली नाही किंवा कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत. अपिलार्थी यांचा असाही युक्तीवाद आहे की, संबंधित संस्थेने माहिती अधिकार अधिनियमांतर्गत जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती केलेली नाही.

आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुनझुनवाला कॉलेज, वाशी यांचेतर्फे कोणताही युक्तीवाद करण्यात आलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती किंवा वस्तुस्थितीदर्शक उत्तर दिलेले नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुनझुनवाला कॉलेज, वाशी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या सहा माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुनझुनवाला कॉलेज, वाशी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २६.०६.२०२३, दि.२७.०६.२०२३, दि.१७.०७.२०२३, दि.१९.०७.२०२३, दि.०१.०७.२०२३, दि.१२.०७.२०२३ रोजीच्या सहा माहिती अर्जांना अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.
३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.११.१२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २३ ऑक्टोबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, आमलेंडू रॉयमार्ग, जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

-**यांना प्रत**
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,
आमलेंडू रॉयमार्ग, जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३. **यांचे मार्फत प्रत रवाना.**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

**सुनावणी दिनांक ११.१२.२०२४ ( In Continuation of order dt.२३.१०.२०२४)**

**विवेचन**

उपरोक्त दि.२३.१०.२०२४ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबतचे स्पष्टीकरण सादर करणेबाबत आदेशित केले होते. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ११.१२.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या ऑनलाईन उपस्थित आहेत. तसेच त्यांचे प्रतिनिधी ॲड.सिध्दांत त्रिवेदी उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान असे नमूद केले की, आयोगाच्या दि.२३.१०.२०२४ रोजीच्या आदेशान्वये आदेशित करुन देखिल त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे निवदेन केले की, त्यांची जन माहिती म्हणून कालच म्हणजे दि.१०.१२.२०२४ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती न देण्यासाठी त्या जबाबदार नाहीत.

या सुनावणीसाठी The Law Point ह्या संस्थेकडून ॲड. सिध्दांत त्रिवेदी हे उपस्थित राहिले असून, त्यांनी असे निवेदन केले की, ते जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले आहेत. मागील सुनावणीच्या वेळी ते सार्वजनिक प्राधिकरण असलेल्या आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांचेतर्फे सुनावणीसाठी उपस्थित होते. तर आज ते जन माहिती अधिकारी यांचे तर्फे उपस्थित आहेत. सदर आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये आतापर्यंत जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती का करण्यात आली नव्हती. यासंदर्भात त्यांना विचारणा केली असता, आपण त्याबाबतचा खुलासा

आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या संस्थेकडे मागीतला आहे, असे त्यांनी सांगितले. मागील सुनावणीच्या वेळी ते कॉलेज तर्फे उपस्थ्ज्ञित होते व आज ते त्या संस्थेच्या तर्फे आपण उपस्थित नसून, सदर संस्थेच्या जन माहिती अधिकारी यांचेतर्फे उपस्थित आहोत. अशा प्रकारचा युक्तीवाद करुन आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून आले. दोन वेगवेगळ्या तारखांना वेगवेगळ्या भूमिका घेण्याची ॲड.त्रिवेदी यांची ही कृती आक्षेपार्ह होती. तसेच न्यायालयाचे अधिकारी म्हणून न्यायालयाला त्यांचे कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रामाणिकपणे मदत करण्याच्या त्यांच्या जबाबदारीशी त्यांची कृती विसंगत होती. त्यामुळे त्यांना सदर प्रकरणात यापुढे उपस्थित राहण्यास परवानगी नाकारण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांना माहिती मिळण्यास विलंब झाला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे माहिती मिळण्यास झालेल्या विलंबामुळे त्यांना जो त्रास सहन करावा लागला, त्याची नुकसानभरपाई म्हणून रु.१,५०,०००/- इतकी रक्कम आपणास देण्यात यावी.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तीवादात दोन बाबी नमूद केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

प्रथम बाब म्हणजे माहिती देण्यात आलेल्या विलंबासाठी जन माहिती अधिकारी यांना शास्ती लादण्यात यावी. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती दि.१०.१२.२०२४ रोजी करण्यात आली आहे. त्यापूर्वी कोणत्याही जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या संस्थेने केली नव्हती. त्यामुळे सध्याच्या जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या नियुक्तीपूर्व झालेल्या विलंबासाठी जबाबदार धरता येऊ शकत नाही. तथापि आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती न केल्यामुळे अपिलार्थी यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही. ही वस्तुस्थिती आहे. वस्तुत: जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती ही ज्यावेळी संसदेने कायदा पारित केला, त्यानंतर तातडीने करणे आवश्यक होते. मात्र गंभीर बाब अशी आहे की, आपल्याकडे माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत माहितीची मागणी करणारा अर्ज प्राप्त झाल्यानंतरसुध्दा सदर सार्वजनिक प्राधिकरणाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्तीच केली नाही. म्हणजेच त्यांनी संसदेने पारित केलेल्या या कायद्याची अंमलबजावणी न करण्याचे धोरण स्विकारले आहे. अशा परिस्थितीत ज्या भारतीय नागरिकाला या कॉलेजशी संबंधीत माहिती हवी आहे, ती माहिती मिळविण्याच्या सर्व वाटाच या संस्थेच्या व्यवस्थापनाने बंद करुन टाकल्या आहेत. आयोगासमोर झालेल्या द्वितीय अपिलामध्ये प्रथम सुनावणी झाल्यानंतर द्वितीय सुनावणीच्या एक दिवस आधी जन माहिती अधिकारी यांची तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणे ही बाब अतिशय धक्कादायक आहे. तसेच भारतीय संसदेने पारित केलेल्या कायद्याचा अनादर करणारी आहे. परंतु वस्तुस्थिती अशी राहते की, सदर सार्वजनिक प्राधिकरणाच्या या निष्क्रियतेमुळे (inaction) अपिलार्थी माहिती मिळण्यापासून वंचित राहिले, म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (क) नुसार आयोगास प्राप्त असलेल्या अधिकारान्वये अपिलार्थी हे त्यांना झालेल्या मानसिक त्रासाबद्दल नुकसानभरपाई मिळण्यास प्रथम दर्शनी पात्र आहेत, असे आयोगाचे मत आहे.

आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करण्यास विलंब केल्यामुळे, अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांना झालेल्या मानसिक त्रासापोटी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८)(ख) अंतर्गत रु.१,५०,०००/- एवढी नुकसानभरपाईची रक्कम सदर आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी अपिलार्थी यांना का पुरविण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे योग्य होईल.

तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करण्यास विलंब केल्यामुळे, अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांना झालेल्या मानसिक त्रासापोटी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८)(ख) अंतर्गत रु.१,५०,०००/- एवढी नुकसानभरपाईची रक्कम सदर आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी अपिलार्थी यांना देण्याबाबत आदेश का देण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.०२.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ डिसेंबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

प्राचार्य,
आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,

आमलेंडू रॉयमार्ग, जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

**सुनावणी दिनांक १०.०२.२०२५ ( In Continuation of order dt.११.१२.२०२४)**

**विवेचन**

उपरोक्त दि.११.१२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत तसेच अपिलार्थी यांना नुकसान भरपाई का देण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.०२.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर यांचे प्रतिनिधी ॲड.सिध्दांत त्रिवेदी उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी ॲड. सिध्दांत त्रिवेदी यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणत्याच सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. सदर प्रकरण जन माहिती अधिकारी यांचे उपस्थितीकरिता व त्यांचे म्हणणे सादर करणेकरिता पुढील तारखेवर ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांची उपस्थित अनिवार्य राहील. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. सदर प्रकरणी पुढील सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहून, आयोगाच्या दि.११.१२.२०२४ रोजीच्या आदेशाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे सादर करावे.
१. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.११.०२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० फेब्रुवारी, २०२५ .

**सुनावणी दिनांक ११.०२.२०२५ ( In Continuation of order dt.१०.०२.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.१०.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहून, आयोगाच्या दि.११.१२.२०२४ रोजीच्या आदेशाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ११.०२.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी दि.१०.०२.२०२५ रोजी झालेल्या सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी ॲड.सिध्दांत त्रिवेदी हे उपस्थित झाले होते. त्यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणत्याच सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थितीसाठी प्रकरण आज दि.११.०२.२०२५ रोजी ठेवण्यात आले होते. तथापि आज देखिल जन माहिती अधिकारी उपस्थित राहिले नाहीत.

सुनावणीस उपस्थित अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगाने दि.११.१२.२०२४ रोजीच्या सुनावणीमध्ये आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या सार्वजनिक प्राधिकरणास अपिलार्थी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८) (ख) अंतर्गत रु.१,५०,०००/- इतकी नुकसानभरपाई अपिलार्थी यांना देण्याचे आदेश का देण्यात येऊ नयेत, याचा लेखी खुलासा देणेबाबत आदेश दिले होते. तथापि त्यांचेकडून कोणताही खुलासा अद्यापपर्यंत सादर करण्यात आलेला नाही.

सबब पुढील सुनावणीच्या वेळी प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी अपिलार्थी यांना रु.१,५०,०००/- इतकी नुकसानभरपाई का देण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा स्वत: व्यक्तीश: उपस्थित राहून, आयोगासमोर पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे योग्य होईल. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या दि.११.१२.२०२४ रोजीच्या आदेशानंतर देखील माहिती अद्यापपर्यंत न दिल्यामुळे अपिलार्थी यांना माहिती प्राप्त होण्यास झालेल्या विलंबाबात त्यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी अपिलार्थी यांना रु.१,५०,०००/- इतकी नुकसानभरपाई का देण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा आयोगासमोर पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: व्यक्तीश: उपस्थित राहून, सादर करावा.
२. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २५.०७.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या दि.११.१२.२०२४ रोजीच्या आदेशानंतर देखील

माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२७.०२.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ फेब्रुवारी, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

प्राचार्य,
आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,
आमलेंडू रॉयमार्ग, जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर,
आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,
आमलेंडू रॉयमार्ग, जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

**सुनावणी दिनांक २७.०२.२०२५ ( In Continuation of order dt.११.०२.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.११.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांना अपिलार्थी यांना रु.२५,०००/- इतकी नुकसानभरपाई का देण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत व विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २७.०२.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच प्रभारी प्राध्यापक, मोतीलाल कॉलेज यांनी ई-मेल द्वारे असे कळविले आहे की, १२ वी बोर्डाची परिक्षा चालू असून, ती साधारण दि.१९.०४.२०२५ पर्यंत सुरु असते, परंतु कदाचित सर्वसाधारणपणे ती मे महिन्याच्या मध्यान्हापर्यंत सुरु राहील. त्यामुळे त्यांना सदर प्रकरणाची दि.१५.०५.२०२५ नंतरची तारिख सुनावणीकरिता देण्याची विनंती त्यांनी आयोगाकडे केलेली आहे.

आयोगाने आपल्या दि.११.१२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना १५ दिवसात समक्ष किंवा नोंदणीकृत टपालाने पुरविण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे? यासंदर्भात अपिलार्थी यांना विचारणा केली असता, माहिती आपणास प्राप्त झालेली नाही, असे त्यांनी सांगितले. ही माहिती अपिलार्थी यांना का देण्यात आलेली नाही. याबाबतचा कोणताही खुलासा जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या ई-मेलमध्ये देण्यात आलेला नाही.

आयोगाच्या सुनावणीकरिता ऑनलाईन सुविधा उपलब्ध असल्याने, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची १५ मे नंतर तारिख देण्याची विनंती अमान्य करण्यात येत आहे व प्रकरण आयोगाने यापूर्वी दिलेल्या आदेशांची पूर्तता करण्यासाठी व त्याप्रमाणे अहवाल सादर करण्यासाठी पुढील दिनांकावर ठेवण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी आयोगाच्या दि.११.१२.२०२४ रोजी आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी. व त्याबाबतचा खुलासा आयोगासमोर पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा.
२. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी आयोगाच्या दि.११.०२.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबातचा लेखी खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.
३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२१.०४.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

संगणक-११

प्राचार्य,
आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,
आमलेंडू रॉयमार्ग, जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर,
आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,
आमलेंडू रॉयमार्ग, जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

**सुनावणी दिनांक १४.०५.२०२५ ( In Continuation of order dt. २७.०२.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.२७.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी व जन माहिती अधिकारी यांना खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. तसेच तक्रारकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आयोगाच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नसल्याने, दि.०३.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. त्याअनुषंगाने सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १४.०५.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी ई-मेलद्वारे पुढील तारिख मिळणेसाठी अर्ज सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना आयोगाबद्दल अत्युच्च आदर असून, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचे पुर्ण पालन करण्यास कटीबध्द आहेत. परंतु ते सध्या अडचणी मध्ये असून, सुनावणीच्या तारखेला उपस्थित राहू शकत नाही. सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम विद्यापिठाच्या परिक्षा चालु असून, त्या आज देखील आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी या महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या असल्याने, त्यांना परिक्षेच्या कालावधीमध्ये महाविद्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी या सुध्दा महत्वाची प्रशासकिय जबाबदारी सांभाळतात आणि त्यामुळे त्यांची जबाबदारी सुध्दा एवढ्या छोट्या नोटीस कालावधीमध्ये इतरांकडे देता येऊ शकत नाही. या दोन्ही अधिकाऱ्यांची अनुपस्थितीत या परिक्षांवरती विपरित परिणाम होईल व शेकडो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येईल असेही त्यांनी आपल्या अर्जात म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सदर अर्जामध्ये पुढे असेही नमूद केले की, सदर प्रकरणातील अपिलार्थी/तक्रारकर्ता हे आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या महाविद्यालयात सहा.प्राध्यापक असून, त्यांचेविरुध्द चौकशी सुरु आहे व त्यामध्ये त्यांनी नोकरी मिळविण्यासाठी अवैध जात प्रमाणपत्र सादर केल्याचे त्यांच्यावरती आरोप आहेत. त्यामुळे प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी यांना असे वाटते की, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत विविध अर्ज करुन महाविद्यालयाच्या प्रशासनाला त्रास देण्याचा त्यांचा उद्देश असून, त्यामुळे त्यांचेविरुध्द चालू असलेल्या चौकशीसाठी लागणारे मनुष्यबळ इतरत्र वळविणे हा त्यांचा उद्देश आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांचेकडे पुरेसा कागदोपत्री पुरावा आहे. त्यामधून ते अपिलार्थी/तक्रारकर्ता यांच्या वागणुकीची पध्दत निदर्शनास आणू शकतील. तथापि ते सर्व एकत्र करुन पध्दतशीरपणे आयोगासमोर सादर करण्यासाठी त्यांना वेळेची आवश्यकता आहे.

सदर अर्जामध्ये जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी पुढे असेही म्हटले आहे की, सुनावणीची पुढील तारिख मागण्यामध्ये आयोगासमोरील प्रकरणात विलंब करण्याचा तसेच आपली जबाबदारी टाळण्याचा त्यांचा कोणताही उद्देश नाही. परंतु शैक्षणिक तातडी लक्षात घेता व योग्य ती कागदपत्रे गोळा करुन योग्य उत्तर देण्यासाठी त्यांनी वेळेची मागणी केली आहे. दि.०८ जून,२०२५ नंतर कोणत्याही तारखेला ते त्यांचे सविस्तर उत्तर सादर करु शकतील असे त्यांनी म्हटले आहे व दि.०८ जून, २०२५ नंतरच्या तारखेची मागणी केली आहे.

यापूर्वी दि.२७.०२.२०२५ रोजीच्या सुनावणीच्या वेळी सुध्दा जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडून ई-मेलद्वारे पुढील तारिख मिळण्याची विनंती केली होती. त्यामध्ये सुध्दा १२ वीच्या बोर्डाच्या परिक्षा तसेच पदवी व पदव्युत्तर अभ्यास क्रमांच्या परिक्षेचे कारण देऊन मे च्या मध्ये पर्यंत सुनावणीची तारिख देणेबाबत विनंती करण्यात आली होती. आज मे च्या मध्यात सुनावणी ठेवण्यात आली असताना सुध्दा त्याच कारणास्तव तश्या प्रकारची विनंती करुन दि.०८ जून,२०२५ नंतरची तारिख सुनावणी करिता मिळण्याची विनंती केली आहे.

याप्रकरणातील ही सहावी सुनावणी आहे. प्रथम सुनावणी दि.२३.१०.२०२४ रोजी घेण्यात आली. त्यासुनावणीच्या वेळी तसे लक्षात आले होते की, तक्रारकर्ता यांनी ज्यावेळी आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज या सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहिती मागणारा अर्ज केला होता. त्यावेळी त्यांनी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती देखील केली नव्हती. त्यामुळे तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही. याच दि.२३.१०.२०२४ रोजीच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता यांना १५ दिवसांच्या आत समक्ष/नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क माहिती पुरवावी असे आदेश दिले होते. ती माहिती त्यांना अद्यापपर्यंत देण्यात आलेली नाही.

त्यापुढील सुनावणी दि.११.१२.२०२४ रोजी घेण्यात आली. या सुनावणीच्या वेळी The Law Point ह्या संस्थेकडून ॲड. सिध्दांत त्रिवेदी हे उपस्थित राहिले होते. त्यांनी असे निवेदन केले की, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून ते उपस्थित राहिले आहेत. यापूर्वीच्या सुनावणीच्या वेळी ते आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या सार्वजनिक प्राधिकरणातर्फे उपस्थित राहिले होते. सदर आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी तोपर्यंत जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती का केली नव्हती. अशी त्यांना विचारणा केली असता, त्याबाबतचा खुलासा आपण आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झणझुणवाला कॉलेज, वाशी या संस्थेकडे मागीतला आहे. असे त्यांनी सांगितले. मागील सुनावणीच्या वेळी आपण महाविद्यालयातर्फे उपस्थित होतो. तर यावेळेस आपण जन माहिती अधिकारी यांचे तर्फे उपस्थित आहोत. असा युक्तीवाद ॲड. सिध्दांत त्रिवेदी यांनी केला होता.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांची नियुक्तीच दि.१०.१२.२०२४ रोजी झालेली असल्याने, तक्रारकर्ता यांनी ज्यावेळी अर्ज केला त्यावेळी त्या जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त नव्हत्या. या कारणासाठी माहिती देण्यास झालेल्या विलंबाबात त्यांना जबाबदार धरता येऊ शकत नसल्याने, विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कोणतेही आदेश देण्यात आलेले नव्हते. तथापि आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती अधिकार अधिनियमांतर्गत जन माहिती अधिकारी यांची नियुक्तीच न केल्यामुळे तक्रारकर्ता यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे त्यांना झालेल्या मानसिक त्रासापोटी रु.१, ५०,०००/- एवढी नुकसानभरपाई देण्याचे आदेश का देण्यात येऊ नये, याचा खुलासा प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी करणेबाबत आदेशीत करण्यात आले होते व सुनावणी दि.१०.०२.२०२५ रोजी ठेवण्यात आली होती.

दि.१०.०२.२०२५ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून The Law Point ह्या संस्थेकडून ॲड. सिध्दांत त्रिवेदी हे उपस्थित होते. त्यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणत्या सूचना प्राप्त झाल्या नाहीत. त्यामुळे सदरचे प्रकरण जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे जाणून घेण्यासाठी पुढील तारखेवर ठेवण्यात आले व पुढील सुनावणी दि.११.०२.२०२५ रोजी घेण्यात आली.

या सुनावणीच्या वेळी देखील जन माहिती अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. तसेच आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या संस्थेतर्फे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) अंतर्गत रु.१, ५०,०००/- इतकी नुकसानभरपाई तक्रारकर्ता यांना का देण्यात येऊ नये, याचा कोणताही खुलासा करण्यात आला नाही. असा खुलासा करण्यासाठी प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांना एक संधी देण्यात आली. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर यांनी तक्रारकर्ता यांना आयोगाच्या दि.११.१२.२०२४ रोजीच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचे विरुध्द माहिती अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, यासंदर्भात खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर पुढील सुनावणी दि.२७.०२.२०२५ रोजी घेण्यात आली.

या सुनावणीच्या वेळी देखील जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी किंवा प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांचेपैकी कोणीही उपस्थित झाले नाहीत किंवा त्यांनी कोणताही खुलासा सादर केला नाही किंवा अपिलार्थी यांना आयोगाच्या आदेशाप्रमाणे माहिती देखील दिली नाही. त्यानंतरची सुनावणी आज दि.१४.०५.२०२५ रोजी ठेवण्यात आली असून, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडून पुन्हा पुढील तारखेची मागणी करण्यात आली आहे.

हा जो अर्ज जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडून करण्यात आला त्यामध्ये तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणेबाबत त्यांनी काहीही नमूद केलेले नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदार यांनी माहिती मागणारा अर्ज केल्यानंतर ही माहिती त्यांना ३० दिवसामध्ये उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. तसे न झाल्यास झालेल्या विलंबासाठी जन माहिती अधिकारी हे व्यक्तीशः जबाबदार असतात. व त्यासाठी त्यांना शास्तीदेखील लागू शकते. याप्रकरणी ३० दिवसांमध्ये तर माहिती दिलेली नाहीच मात्र त्यानंतर करण्यात आलेल्या प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुध्दा कोणतेही आदेश पारित केले नव्हते. या ठिकाणी ही बाब देखील लक्षात घेणे आवश्यक आहे की, संबंधीत महाविद्यालयाने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची त्यावेळी नियुक्तीच केलेली नसल्याने, अशी कोणतीही सुनावणी किंवा आदेश पारित होणे शक्य नव्हते. मात्र आयोगाने आदेश पारित केल्यानंतरसुध्दा विद्यमान जन माहिती अधिकारी यांची भूमिका ही सातत्याने आयोगाच्या आदेशाचे पालन न करणारी असल्याचे दिसून येते. पुढील तारिख मागणाऱ्या अर्जामध्ये सुध्दा तक्रारकर्ता यांना माहिती देण्याबाबत त्यांनी काय कार्यवाही केली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी काहीच नमूद करत नाहीत. याऊलट ते तक्रारकर्ता यांच्याबद्दलच याप्रकरणाशी संबंधीत नसलेल्या बाबी आयोगाच्या निदर्शनास आणत आहेत. तक्रारकर्ता हे आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या संस्थेमध्ये सहा.प्राध्यापक असून, त्यांचे विरुध्द एका प्रकरणामध्ये चौकशी सुरु आहे व त्यामुळे संस्थेला त्रास देण्याच्या उद्देशातून ते माहितीची मागणी करत आहेत. हे सांगण्याचा जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी प्रयत्न करत आहेत. परंतु या बाबीचा आणि त्यांना माहिती न देण्याचा काय संबंध आहे. याचा उल्लेख मात्र त्यांनी आपल्या अर्जामध्ये देखील केलेला नाही. आयोगाने आदेश दिल्यानंतर त्यांचे पालन करणे जन माहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक होते. ते त्यांनी केलेले नाही. मात्र एखाद्या सहाय्यक प्राध्यापकावर एखाद्याप्रकरणात चौकशी सुरु असेल, तर ते माहिती मिळविण्यासाठी कसे अपात्र ठरतात हे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. ज्याचा दुरान्वयानेही याबाबीशी संबंध नाही.

वरील काही परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणातील जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची भूमिका ही टोलवाटोलवीची, आयोगाच्या आदेशांचे पालन न करणारी व आपल्या जबाबदारीची जाणीव नसणारी असल्याचे जाणवते. जन माहिती अधिकारी यांची वर्तवणूक तर एवढी बेजबाबदारपणाची आहे की, त्यांचेविरुध्द शास्ती का लावण्यात येऊ नये यासंबंधीचा खुलासा सादर करण्याची संधी त्यांना दिली असताना देखील त्यांनी खुलासा सादर करण्याची तसदी घेतली नाही. यावरुन त्यांना कोणताही खुलासा सादर करावयाचे नाही असे स्पष्ट होते. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर,आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी आयोगाकडे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबातचा कोणताही खुलासा सादर केलेला नाही. त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कोकण विभाग, पनेवल यांनी श्रीम.आरती नेरकर यांचे वेतनासाठी सदर महाविद्यालयाला देण्यात येणाऱ्या अनुदानातून ०५ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र.००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षा खाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कोकण विभाग, पनेवल यांनी आयोगास सादर करावा.

१. प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी अपिलार्थी/तक्रारकर्ता यांना रु.१,५०,०००/- इतकी नुकसानभरपाई का देण्यात येऊ नये याबाबतचा कोणताही खुलासा सादर केलेला नाही. त्यांना खुलासा सादर करण्याची शेवटची संधी देण्यात येत आहे. त्यांनी सदर खुलासा आयोगासमोर पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: व्यक्तीश: उपस्थित राहून, सादर करावा.

२. तक्रारकर्ता यांना अद्यापही माहिती न मिळाल्यामुळे याप्रकरणात चौकशीसाठी जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांची आयोगासमोर उपस्थिती आवश्यक असल्याने, या चौकशी करिता उपस्थित राहणेस्तव उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांनी जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर,आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (३) (क) अन्वये तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता अनुषंगाने आयोगास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढील सुनावणीस उपस्थित राहणेबाबत समन्स काढण्यात यावे. सदर समन्सची बजावणी वाशी पोलीस स्टेशन, वाशी यांचे मार्फत तसेच पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे मार्फत् करण्यात यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२८.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १४ मे, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

२. उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

३. प्राचार्य,आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,आमलेंडू रॉयमार्ग,
जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

४. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कोकण विभाग, पनेवल, शासकीय अध्यापक
महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड ४१० २०६.

५. आहरण व संवितरण अधिकारी, उच्च शिक्षण कोकण विभाग, पनेवल, शासकीय अध्यापक
महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड ४१० २०६.

६. विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,आमलेंडू रॉयमार्ग,
जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

## सुनावणी दिनांक २८.०७.२०२५ ( In Continuation of order dt. १४.०५.२०२५)

## विवेचन

उपरोक्त दि.१४.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांना सुनावणीस उपस्थित राहणेबाबत आदेशीत केले होते. तसेच जन माहिती अधिकारी यांना उपस्थित राहणेबाबत समन्स बजावण्यात आले होते. त्याअनुषंगाने सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २८.०७.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता/अपिलार्थी उपस्थित आहेत. तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी डॉ.ज्योती सतिश भारांबे व विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी डॉ.अनिता गोस्वामी-गिरी, प्राचार्या, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,

वाशी तसेच जन माहिती अधिकारी श्रीम.आरती नेरकर, ज्यु.क्लर्क, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी उपस्थित आहेत. तसेच ॲड. ओमप्रकाश झा उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी प्राचार्य, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांनी आपले लेखी निवेदन सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, दि.२५.०७.२०२३रोजीचा माहिती अर्ज व दि.१५.०९.२०२३ रोजीचा प्रथम अपील अर्ज व त्यावर झालेली कार्यवाही ही त्या महाविद्यालयात रुजू होण्यापूर्वीची आहे. त्या दि.३१.०५.२०२५ रोजी प्राचार्य पदावर आयसीएल शिक्षण संस्थेचे, मोतीलाल झुनझुनवाला कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाशी, नवी मुंबई येथे रुजू झाल्या आहेत. तरी देखील महाविद्यालयातील उपलब्ध नोंदीच्या आधारे शक्य तितकी माहिती देण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. त्यांनी आपल्या लेखी निवेदनामध्ये पुढे असेही नमूद केले की, आजच्या सुनावणीस त्या स्वत: विद्यमान प्राचार्या डॉ.अनिता गोस्वामी-गौरी तसेच तत्कालीन प्रभारी प्राचार्या व विद्यमान उप-प्राचार्य डॉ.ज्योती भारंबे व जन माहिती अधिकारी श्रीमती आरती नेरकर या उपस्थित आहेत. अपिलार्थी यांना देण्यासाठी ११९ पृष्ठांची माहिती आज सोबत आणली असून, ती सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांना देण्यात येईल.

आय.सी.एल.ई.एस. या शिक्षण संस्थेच्या मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी यांचे तर्फे ॲड.ओमप्रकाश झा यांनी युक्तीवाद केला. आपले युक्तीवादामध्ये त्यांनी असे नमूद केले की, आयोगाच्या आदेशाचे पूर्णत: पालन केलेले आहे व त्याअनुषंगाने आज अपिलार्थी यांना पुरविण्यासाठी संपूर्ण माहितीसह ते उपस्थित झाले आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांचेवर लावण्यात आलेल्या शास्तीचा त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी मागणी केलेली नुकसानभरपाईची रक्कम देण्यात येऊ नये, असे निवेदन ॲड. ओमप्रकाश झा यांचे तर्फे करण्यात आले.

याप्रकरणातील एकूण वस्तुस्थिती बघितली असता, पुढीलबाबी प्रकर्षाने निष्पन्न होतात. त्यातील सर्वात महत्वाची बाब म्हणजे आयोगाने आदेश देईपर्यंत मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या महाविद्यालयाने त्यांच्या महाविद्यालयाची माहिती भारतीय नागरिकांना उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांची व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्तीच केलेली नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा २००५ या वर्षी कार्यन्वीत केला असल्याने व तो संपूर्ण भारत देशात लागू केला असल्याने, तो या संस्थेस लागू असताना जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती डिसेंबर २०२४ मध्ये करण्यात आली व त्याकरिता कोणतेही स्पष्टीकरण महाविद्यालयातर्फे देण्यात आले नाही. अर्थात यासाठी कोणतेही स्पष्टीकरण कायद्यानुसार देता येऊ शकत नाही.

सदर महाविद्यालयात जन माहिती अधिकारीच नियुक्त केले नसल्याने, कोणत्याही भारतीय नागरिकाला एवढ्या प्रदिर्घ कालावधीसाठी या संस्थेतून माहिती मिळविण्याचा आपला हक्क बजावण्यापासून सदर संस्थेने जाणीवपूर्वक वंचित ठेवले आहे. हे स्पष्ट होते. या प्रकरणातील अपिलार्थी यांनी ज्यावेळी माहिती मागणारे अर्ज सादर केले त्यानंतर तरी किमान ही बाब लक्षात आल्याने जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करुन संस्थेने त्यांना माहिती देण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होते. परंतु तसेही झाले नाही. त्यांनी प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यावर सुध्दा कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यावेळी सुध्दा जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती करुन अपिलार्थी यांच्या प्रकरणात सुनावणी घेऊन माहिती देण्याबाबत अथवा न देण्याबाबत आदेश पारीत करणे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना शक्य झाले असते. परंतु या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने आणि विशेषत: महाविद्यालयाचे प्रशासन प्रमुख म्हणून प्राचार्याने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी या पदावर योग्य व्यक्तींची नेमणूक करणे आवश्यक असताना देखील केली नाही.

आयोगासमोर या अपिलांची सुनावणीची सुरुवात झाल्यानंतर सुध्दा तातडीने जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. म्हणजे एकूणच या शैक्षणिक संस्थेचा सूर हा सदर कायद्यातील तरतूदींचे पालन न करण्याचा होता.

दुसरी व अतिशय महत्वाची बाब येथे नमूद करणे आवश्यक वाटते की, दि.११.११.२०२४ रोजीच्या आदेशामध्ये आयोगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती करावी असे स्पष्ट आदेश आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या संस्थेला दिले होते. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती त्या संस्थेमार्फत करण्यात आली. मात्र प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती त्यावेळी करण्यात आली नाही. अशा परिस्थितीमध्ये माहिती मिळविणाऱ्या नागरिकांना किती शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागाला असेल किंवा

किती नागरिकांना मुळात माहिती मिळवण्यासाठी अर्जच सादर करता आले नसतील, हे आकलनाच्या पलिकडचे आहे. या प्रकरणामधील अपिलार्थी डॉ.असरार अहमद नजीर अ.सिद्दीकी यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याने व द्वितीय अपिलामध्ये सुध्दा त्यांनी हे प्रकरण अतिशय जोमाने लावून धरल्यामुळे, आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या महाविद्यालयाला माहिती द्यावी लागली. तथापि त्यासाठी अपिलार्थींना प्रदिर्घ कालावधीसाठी लढा द्यावा लागला व त्यामध्ये निश्चितपणे त्यांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागला आहे व त्यामुळे ते माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम (१९)(८)(ख) नुसार नुकसानभरपाई मिळण्यास पात्र आहेत. असे आयोगाचे मत आहे. याप्रकरणी त्यांनी दाखल केलेले सर्व द्वितीय अपिले व तक्रारींसाठी त्यांना रु.५०,०००/- इतकी नुकसानभरपाई देणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थींना/तक्रारकर्त्यांना माहिती मिळविण्यासाठी जो त्रास सहन करावा लागला त्याची भरपाई म्हणून आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या प्राधिकरणाद्वारे अपिलकर्त्यास/तक्रारकर्त्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८)(ख) अंतर्गत रु.५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत आहे. सदर रक्कम आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज, वाशी या संस्थेने अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत धनादेशाद्वारे अदा करावी व कार्यपुर्ती अहवाल आयोगास सादर करावा.

२. अपिलार्थी/तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त झाल्यामुळे, प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक : के.आर.- ७५/२०२४, के.आर.- ८५/२०२४, के.आर.- ८६/२०२४, के.आर.- १६२/२०२४, के.आर.- १७०/२०२४, के.आर.- २६०/२०२४ मधील तक्रार क्र.१०९/२०२५ निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ जुलै, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
आय.सी.एल.ई.एस.मोतीलाल झुणझुणवाला कॉलेज,
आमलेंडू रॉयमार्ग, जुहूनगर वाशी, सेक्टर ९ए,
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.